# कॅलिडोस्कोप

## हाफिजच्या सभेत पॅलेस्टिनी राजदूत

**नवी दिल्ली :** मुंबई हल्ल्याचा सूत्रधार दहशतवादी हाफिज सईद याने पाकिस्तानमध्ये आयोजित केलेल्या एका सभेला पॅलेस्टाइनचे पाकिस्तानमधील राजदूत वालिद अबू अली उपस्थित राहिल्याबद्दल भारताने तीव्र नाराजी व्यक्त केली. भारताच्या या नाराजीनंतर पॅलेस्टाइनने या राजदूताला माघारी बोलावून घेत भारताची माफी मागितली आहे.

सकाळ
सातारा, रविवार, ३१ डिसेंबर २०१७
८

## टॉकिंग हेडलाइन - आलोक




# चेहऱ्यावर एक अन् ओठांवर दुसरेच

### राष्ट्रहिताच्या नजरेतून

**पुढील लोकसभेच्या निवडणुकीपर्यंत विकासाचा मुद्दा नव्हे; तर राष्ट्रवाद, हिंदुत्व आणि भ्रष्टाचाराच्या विरोधातील लढाई हे मुद्देच नरेंद्र मोदी यांच्या राजकारणाचा केंद्रबिंदू असणार आहेत.**



शेखर गुप्ता, ज्येष्ठ पत्रकार



सरत्या वर्षांतील ठळक राजकीय घडामोडी कुठल्या, असा विचार केला तर डोळ्यासमोर नेमके काय येते? आपल्या समोर काही पर्यात दिसतात : गुजरातमधील निवडणुकीत विजय प्राप्त केल्यानंतर दोन बोटांनी विजयी झाल्याची खूण करत असलेले पंतप्रधान नरेंद्र मोदी; गांधी टोपी घातलेले राहुल गांधी हे काँग्रेसचा ध्वज फडकावत आहेत; देशाला नवे दलित राष्ट्रपती मिळाले आहेत; विजयोत्सव साजरा करत असलेले अमरिंदरसिंग; केजरीवाल हे 'ईव्हीएम'ला दोष देत आहेत; योगी आदित्यनाथ नावाच्या नव्या ताऱ्याचा भाजपमध्ये उदय होतो आहे आणि ते नोएडा बाबतच्या सर्व अंधश्रद्धा दूर सारून तेथील मेट्रोच्या उद्घाटनाला ते उपस्थित आहेत.

जर तुम्हाला आणखी गुंतागुंतीच्या गोष्टींमध्ये रुची असेल तर तुम्ही नितीशकुमार यांची निवड करू शकता, जे विजय रूपानी यांच्या शपथविधी समारंभाला भाजपच्या इतर मुख्यमंत्र्यांप्रमाणे हजर उपस्थित आहेत. आपल्या मुख्यमंत्रीपदाच्या शपथविधीवेळी मोदी उपस्थित राहणार नाहीत याची व्यवस्थित काळजी घेणारे नितीशकुमार ही तुम्ही याच दशकात पाहिलेले आहेत. याचबरोबर तुरुंगात परताणारे लालूप्रसाद यादव यांचीही तुम्ही निवड करू शकता, ज्यांचा ट्विटर हँडल सध्या भलताच चर्चेत आहे.

माझ्या डोक्यातील राजकीय चित्र मात्र याच्याशी मिळते जुळते नाही. गुजरातमधील निवडणुकीतील विजयानंतर भाजपच्या संसदीय पक्षाच्या बैठकीत बोलत असताना भावनिक झालेले नरेंद्र मोदी मला दिसतात. मोदींची ही प्रतिमा मला महत्वाची वाटते. कारण २०१७मधील मोदींची हीच प्रतिमा २०१८च्या राजकारणाचा बाज ठरविणार आहे आणि २०१९मधील राजकीय संग्रामाची पटकथाही लिहिणार आहे.

दुसऱ्या पंतप्रधानांच्या तुलनेत मोदी हे आपल्या मनातील भावभावना कोंडून ठेवण्यात बऱ्याच अंशी यशस्वी झाले आहेत. कारण, सार्वजनीक कार्यक्रमांमधील त्यांची उपस्थिती, त्यांचा वावर सजग असतो आणि भावनांचे प्रदर्शन तर अतिशय विचारपूर्वक असते. भाजपच्या संसदीय पक्षाच्या बैठकीत ते ज्याप्रमाणे भावनिक झाल्याचे दिसून आले ती त्यांची उत्स्फूर्त अशी प्रतिक्रिया असावी. जरा वाढवून सांगायचे झाले तर ते पंतप्रधानांचे अतिशय नियंत्रित भावोद्गार होते. गुजरातमधील प्रचार मोहिमेच्या मध्यावरच पंतप्रधानांना जाणीव झाली होती की, या वेळची लढाई अतिशय अटीतटीची असणार आहे. नोव्हेंबरच्या अखेरपर्यंत निवडणूक लोकांनी विचार केली होती त्यापेक्षाही अधिक अटीतटीची झाली होती. ज्या जागांवर अतिशय कमी फरकांनी विजय प्राप्त करण्यात यश मिळाले आहे, अशा ठिकाणी थोडीफार मते जरी दुसऱ्या बाजूला गेली असती तर बहुमत असूनही त्याचा मोठा फटका भाजपला सहन करावा लागला असता. यामुळे संक्रमणाच्या काळातून जात असलेली काँग्रेस चांगलीच बळकट होण्यास मदत झाली. भाजपच्या विरोधातील पक्षांना चुंबकाप्रमाणे एकाबाजूला आणण्यात काँग्रेसला यश मिळाले. नितीशकुमारांसारखे नवे सोबतीही डगमगले असते. अशा वेळी मोदींनी केलेली अतिशय भावनिक भाषणे दिलासा देणारी ठरलीच, पण या भाषणांमधून राग ही व्यक्त होत होता. हा राग मोदींची पुढील राजकीय रणनीती ठरविण्याची शक्यता आहे. त्यांच्या रागाचे कारणही आपण समजू शकते. गुजरातमधील अटीतटीच्या लढतीसाठी तब्बल २२ वर्षे सत्तेत राहिल्यामुळे सरकारच्या विरोधात तयार झालेले जनमत कारणीभूत ठरल्याचा कितीही दावा भाजपने केला तरी मोदी मात्र यावर विश्वास ठेवणार नाहीत. त्यांना माहित आहे की ते पंतप्रधान झाल्यानंतर गुजरातमध्ये झालेली ही पहिलीच विधानसभा निवडणूक आहे. अशा परिस्थितीत सत्ताधाऱ्यांच्या विरोधात असलेल्या वातावरणाला फारसे महत्व देऊन चालणार नाही. मोदी दिल्लीत आल्यानंतर अवघ्या साडे तीन वर्षांतच गुजरातमधील परिस्थिती भाजपच्या हाताबाहेर गेली. या काळात दोन मुख्यमंत्री बनले आणि ते दोघेही विशेष असा प्रभाव पाडू शकले नाहीत. जाती-आधारीत जनआंदोलनांना जोखण्यात आणि त्यांच्यावर नियंत्रण प्रस्थापीत करण्यात पक्ष आणि राज्य सरकार अशा दोघांनाही अपयश आले.

शेतकऱ्यांचा राग तर असा टप्प्यावर पोहचला होता की, त्याचा सामना करणे मोदींसाठी प्रचंड अवघड काम होते. मोदींना नापसंत करणाऱ्या नेत्यांची एक जमात तयार झाली आहे आणि विशेष म्हणजे या नेत्यांचा काँग्रेसला ही दरारा वाटतो आहे. या सगळ्या घटना ज्या राज्यात घडल्या आहेत त्याच राज्यातून पंतप्रधान आणि सत्ताधारी पक्षाचे आध्यक्ष येतात. पंतप्रधानपदाच्या चौथ्या वर्षातही मोदींना गुजरातची चिंता कायम आहे. तसेच, गुजरातच्या विजयाची भेट त्यांचा पक्ष देऊ शकलेला नाही, त्यामुळे मोदींना राग येणे स्वाभावीक आहे.

गुजरातच्या निकालांमधून जो खोलवरचा अर्थ निघतो त्याची मोदींना पुरेपूर जाणीव आहे. 'जीडीपी'चे आकडेवारी आनंद देणाऱ्या स्तराच्याही खाली जात आहेत. बेरोजगारीची झळ बसत असलेला तरुण वर्गही शेतकऱ्यांप्रमाणेच चिंताक्रांत आहे. असे असले तरी अर्थव्यवस्थेची कमी झालेली गती वाढविण्याचा कुठलाही तातडीचा पर्याय उपलब्ध नाही. तसेच, आर्थिक वाढ वेगाने झाली तरी तरुणांना मोठ्या संख्येने रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी उशीर झालेला असेल. मोदींसाठी तरुण वर्ग ही अतिशय महत्वाची मतपेढी आहे. नव्या वर्षांत या सर्व चिंतांचे समाधान करण्यावर ते भर देतील, असे दिसून येते आणि त्यातूनच त्यांची भविष्यातील राजकारणाच्या आखाड्यातील रणनीती निश्चित होईल. गुजरातमध्ये मिळालेला अल्प विजय इतर ठिकाणीही प्राप्त करण्याचे प्रयत्न आता मोदींचे विरोधक करतील.

आता उत्तर प्रदेश ऐवजी गुजरातची निवडणूक भविष्यातील राजकारणाला आकार देणार असे दिसते. मोदी आणि शहा यांचे राज्य असूनही त्या ठिकाणी विजयासाठी भाजपला मोठा संघर्ष करावा लागला. उत्तर प्रदेशात त्रिकोणी लढतीत फारशा लोकप्रिय नसलेल्या नेत्यांच्या विरोधात भाजपने चांगली कामगिरी केली होती.

मोदी गुजरातमधील अटीतटीच्या लढतीतून जे निष्कर्ष काढतील ते २०१९मधील लोकसभा निवडणुकीपूर्वी होणाऱ्या दहा राज्यांच्या निवडणुकांच्या दृष्टिने महत्वाचे शकतील. पहिला धडा जरा जुना आहे. ज्या वेळी हिंदू एकत्रितपणे मतदान करातात त्या वेळी भाजपचा विजय होतो. त्याचवेळी मोठ्या जातींच्या आधारावर होणारे मतदान भाजपचे नुकसान करणारे ठरते. लहान जातींच्या प्रभावांना अमित शहा हे आपल्या कौशल्याने कमी करू शकतात. परंतु, आपल्या निवडणुकीच्या राजकारणातील मूळ मुद्दा हा असतो की जातींच्या आधारे विभागला गेलेल्या समाजाला धर्माच्या धाग्याने एकत्रित करू शकता का? काँग्रेसने जिग्नेश, अल्पेश आणि हार्दिकच्या मदतीने जवळजवळ जिंकलेच होते. त्यामुळे याची पुनरावृत्ती होणार नाही यासाठी मोदी-शहा हे प्रयत्न करणार हे निश्चित. परिणामी हिंदूत्वाचा मुद्दा पुढे करत सामाजीक ध्रुविकरण वाढण्याची शक्यता आधिक आहे.

तिहेरी तलाकला गुन्हा ठरविण्याबाबतचे विधेयक हे या दिशेने टाकण्यात आलेले पहिले पाऊल आहे. याचे उत्तर राहुल गांधी हे मंदिरांमध्ये दर्शन घेऊन देण्याचा प्रयत्न करतील. मात्र, या विधेयकाला विरोध करण्यासाठी अतिशय टोकदार राजकीय प्रतिभेचा वापर करावा लागेल, कारण अल्पसंख्याकांच्या लांगूनचालनाचा आरोपही लावता येऊ नये. कर्नाटकमध्ये टिपू सुलतान हे काम करू शकतात तर राजस्थान आणि मध्य प्रदेशात अशा प्रकारचे मुद्दे शोधले जाऊ शकतात.

भाजपने कितीही विकासाचे नारे दिले तरी या पक्षाला हे पक्के ठाऊक आहे की, आता अर्थव्यवस्थेतून रोजगार निर्माण होणार नाहीत आणि त्यामुळे या मुद्यावर मतेही मिळणार नाहीत. फक्त भ्रष्टाचाराच्या विरोधातील लढाईचे राजकीय इंधन तेवढे शिल्लक राहिले आहे. त्यामुळे पुढील काळाता मुद्दे बदलले जातील. काही बड्या व्यक्तींच्या विरोधातील कारवाई आणि छाप्यांचा वेग वाढू शकतो. तसेच काही उद्योगांचे दिवाळे निघाल्याचे घोषित केले जाईल. '२-जी' गैरव्यवहार प्रकरणी सर्व आरोपी निर्दोष ठरल्यामुळे मोदींच्या भ्रष्टाचारविरोधी प्रतिमेला तडा गेला आहे. सरकारवर अलिकडे झालेले आरोप टिकू शकले नाहीत आणि 'अदानी-अंबानी सरकार' हा 'जुमला' 'रिट्विट' होऊ शकतो, पण तो मते मिळवून देऊ शकत नाही. अशा परिस्थितीत सरकार भ्रष्टाचार विरोधी मोहिम अधिक जोशात चालवणार हे निश्चित.

निवडणुकीच्या राजकारणात विजयी ठरणारे समीकरण म्हणजे धर्म आणि राष्ट्रवादाचे मिश्रण हे आहे. राष्ट्रवादाच्या नावाखालील घटनांमध्ये वाढ झाल्याचे दिसते आहे. संकटाच्या काळात संपूर्ण देश सरकारच्या विरोधात उभा राहिल्याची उदाहरणे इतिहासात दिसतात. पाकिस्तानच्या विरोधातील सूर अधिक मोठा झाल्याचे दिसून येईल. त्याला वृत्तवाहिन्यांवरील जोरजोरात होणाऱ्या चर्चांची मदत मिळू शकेल. मात्र, चीन बाबत ठोस धोरण नसल्यामुळे परिस्थिती चिघळू शकते. आक्रमक राष्ट्रवाद आणि आपल्या सामरिक सीमा यांच्यात ताळमेळ प्रास्थापित करण्याचा प्रयत्न मोदी सरकारसाठी आव्हानात्मक ठरणार आहे. त्यामुळे धर्म, राष्ट्रवाद आणि भ्रष्टाचार हे भाजपच्या आगामी निवडणूक राजकारणाची तीन इंजिने असणार आहेत. त्याच दरम्यान कधी कधी विकास, रोजगार आणि अच्छे दिन बाबतही ऐकाला मिळू शकते. ह्या घोषणा फक्त उत्तर आणि चिंतन ठरतील. डोळ्यांत आश्रू आलेला मोदींचा चेहरा हा त्यांची या पुढील काळातील प्रतिमा दर्शविणारा ठरणारा आहे.

**(अनुवाद : अशोक जावळे)**




## छोट्या जाहिराती

### ऑटोमोबाईल

#### वाहन खरेदी-विक्री

**सातारा येथील तवेरा** २००८ मॉडेल, १० सिटर, गुड कंडिशन, विकणे आहे. संपर्क : ९८२२ ४७३३३०/ ८१४९९७६२७६.

### सल्ला/मार्गदर्शन/भविष्य

#### व्यक्तिगत मार्गदर्शन

**वजन कमी करणे,** वाढविणे व मेंटेन करणे, निरोगी राहणे, एक सोपे टेक्निक आहे. कसे ते जाणून घ्या. अधिक माहितीसाठी संपर्क : ७०२८६५४३४३.

#### ज्योतिष

**श्री राजहंस ज्योतिष.** १००% ए टु झेड सर्व समस्या समाधान. लव्हप्रॉ., प्रेमविवाह, प्रेमातधोका, तलाक,शत्रू,सौतन,व्यापारलाभ स्पे घरबसल्या काम. फी काम झाल्या वर, पुणे. ९७६४७३८७०१.

**श्री समर्थ ज्योतिष** सर्व समस्यांचे एका तासात १००% गॅरेंटेड रिझल्ट. प्रेमात धोखा, मनासारखे प्रेम, घटस्फोट, शत्रुपिडा, प्रेम समस्या स्पेशालिस्ट. शिवाजीनगर ९९८७७२६७२५.

**ज्योतिष महाविद्यालय, कराडचे** जानेवारी २०१८ पासून नवीन बॅचसाठी कुंडली ज्योतिष (बेसिक व ॲडव्हान्स) हस्तरेषाशास्त्र, अंकशास्त्र कृष्णमूर्ती पद्धतीचे अभ्यासवर्ग सुरू आहेत. मर्यादित जागा, त्वरित प्रवेश घ्यावा. संपर्क ऑफिस (०२१६४) २२२५११. मोबा. : ९८२२४९८४५२.

**॥श्री॥ ज्योतीष (लव्ह** प्रॉब्लेम स्पेशालिस्ट) तुमच्या सर्व समस्येवर ताबडतोब उपाय. मार्गदर्शनासाठी संपर्क : ९६१९-३९४६६४/ ९६१९४६२७०६.

**मायावी ज्योतिष (गोल्ड** मेडलिस्ट रजि. नं. ३३६९९) अघोर चंडी सिद्धिप्राप्त (चंडी उपासक) १००% काम होणारच! सौतन, शत्रूपीडा, गृहक्लेश, तलाक, संतान, प्रेमविवाह (लव्ह प्रॉ.) (ब्रेकप / पॅचप, स्त्री-पुरूष समस्या स्पेशा.) (पुणे). ०२०-२४३६ २४९६ / ९८८११९५५८८.

### अर्थविषयक

#### कर्ज

**बँकेतील गहाण ठेवलेले** सोने आर्थिक अडचणीअभावी सोडवून घेऊन विकणे असल्यास आर्थिक सहाय्य करून विकत घेतले जाईल. पाकिजा गोल्ड, २५७, शनि मारुती मंदिरासमोर, सातारा. ८३०८४५६८७०, ९४२२६०६१४९.

#### गुंतवणूक

**एसआयपी टॅक्स सेव्हिंग** व टॅक्स फ्री मासिक उत्पन्न या गुंतवणूकीसाठी संपर्क विजय बाचूलकर, राधिका रोड, सातारा. ९४२११११५५६०.

**सर्व प्रकारच्या एलआयसी** पॉलिसी, मनी बॅक, जीवन आरोग्य, कॅन्सर एंडोमेंट इ करिता संपर्क साधा योग्य सेवा व मार्गदर्शनासाठी मो. : ९९२१७७६६५०.

### शेतीविषयक

#### शेतीसाहित्य

**पवार सेकंडहॅण्ड औजारे** एजन्सी. आम्ही जुने ट्रॅक्टर तसेच सर्व २२ प्रकारची जुनी शेती औजारे विकत घेतो व विकत मिळतीलसुद्धा. संपर्क : ९१७२५६०५७५.

### अन्य विषय

#### नाव/पत्त्यात बदल

**माझे लग्नापूर्वीचे नाव** कु. वैशाली प्रभाकर जोशी असे होते ते बदलून आता सौ. प्रणिता राजेंद्र कुलकर्णी असे आहे. २६५२. दिनांक : २०-१२-१७.

### वाचकांसाठी निवेदन

सकाळ वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या नोकरीविषयक, कर्ज, गुंतवणूक, व्यवसाय-धंदा तसेच इतर सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. प्रत्येक जाहिरातीच्या आशयाची सखोल शहानिशा करणे शक्य नसल्यामुळे, यातील कोणत्याही माहितीच्या सत्यतेबाबत सकाळ व्यवस्थापन हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी. जाहिरातींसंदर्भात कोणतेही आर्थिक व्यवहार करताना तसेच वैद्यकीय सल्ले अथवा शिफारशी घेताना वाचकांनी ते पूर्णतः स्वतःच्या वैयक्तिक जोखमीवर करावेत. जाहिरातीतील आपल्या उत्पादनाच्या अथवा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावा करतील, तसेच जाहिरातदाराकडून जाहिरातीत केलेला दावा फोल ठरल्यामुळे किंवा अन्य कारणाने वाचकांची फसवणूक किंवा कोणत्याही प्रकारच्या नुकसानीस व उद्भवणाऱ्या परिस्थितीस सकाळ वृत्तपत्र समूहाचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाहीत, याची कृपया नोंद घ्यावी.

– मुख्य व्यवस्थापक

## पाकच्या १९२ नागरिकांच्या व्हिसा प्रक्रियेला स्थगिती

**इस्लामाबाद, ता. ३० (पीटीआय) :** नवी दिल्लीत एक जानेवारीपासून सुरू होणाऱ्या हजरत निजामुद्दीन औलिया उरुसात सहभागी होऊ इच्छिणाऱ्या पाकिस्तानच्या १९२ नागरिकांच्या व्हिसा प्रक्रियेला भारताने तात्पुरती स्थगिती दिल्याचे पाकिस्तानने म्हटले आहे. भारताच्या निर्णयामुळे पाकच्या जायरीन (भाविक) यांना उरुसात सहभागी होता येणार नाही, असे तरी सध्या दिसते.

### जमीन खरेदी पूर्व जाहीर नोटीस

सातारा जिल्ह्यातील तमाम लोकांना या नोटीसद्वारे कळविणेत येते, की डिव्हिजन पाटण पैकी खालील तक्त्यात नमूद अनुसूचीमध्ये दर्शवल्याप्रमाणे जमीन धारकांच्या जमिनी शासन निर्णय क्र. पुनवं-२०१४ (प्रकृ-२२०/१४ (मप्र) मंत्रालय मुंबई दि. ३१/१०/२०१७ अन्वये प्राधिकृत प्रतिनिधी मा. जिल्हा पुनर्वसन अधिकारी सातारा हे वांग मध्यम प्रकल्प ता. पाटण, जि. सातारा अंतर्गत बुडीत क्षेत्र डावी बाजू मौजे उमरकांचन गट नं. ८३१ व मौजे मेंढ गट नं. ३४४ मधील खासगी क्षेत्रातील जमीन खासगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पद्धतीने ताब्यात घेणेचे प्रस्तावित आहे.

खालील अनुसूचीमध्ये वांग मध्यम प्रकल्पाच्या वर सरकून गावठाणासाठी मौजे उमरकांचन व मौजे मेंढ, ता. पाटण, जि. सातारा येथील आवश्यक गट नं. व क्षेत्राचा तपशील दिला आहे. सदर जमिनीबाबत जमीन मालकाच्या हिस्स्यावर हक्क, हितसंबंध, दत्तक पत्र, वारसा हक्क, गहाणखत, दान, बोजा, लिज, कर्ज, जप्ती, करार मदार वा इतर हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत पुराव्यानिशी लेखी तक्रार कार्यालयीन वेळेत समक्ष अथवा रजिस्टर पत्राने इकडील कार्यालयास कळवावे.

मुदतीत कोणतीही हरकत न आल्यास सदरहू जमीन मालकाची मिळकत निर्वेध वा निजोखमी असल्याचे समजून इकडील कार्यालय व महाराष्ट्र शासन यांच्या वतीने मुदतीनंतर केव्हाही पुढील खरेदीचा व्यवहार पूर्ण करील. दिलेल्या मुदतीनंतर कोणाचीही हरकत असल्यास ती या कार्यालयास कायदेशीररित्या बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी. ही खरेदी पूर्व नोटीस दिली.

**(अ. क्र., गावाचे नाव, गट नं., आवश्यक क्षेत्र याप्रमाणे)**
**१) उमरकांचन, ८३१, १.५६ हे. ०.१४ हे. पोटखराब**
**२) मेंढ, ३४४ अंशतः, एकूण क्षेत्रापैकी ७.५० हे. आर.**

सही/- आरती भोसले
उपजिल्हाधिकारी (पुनर्वसन)
सातारा

» पान १ वरून

लोकप्रिय गीते आणि नृत्याच्या रंगतदार मनोरंजन सोहळ्याची मेजवानीदेखील महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या शेतकऱ्यांनी या वेळी अनुभवली.

सकाळ माध्यम समूहाचे अध्यक्ष प्रतापराव पवार, संचालक भाऊसाहेब पाटील, मुख्य संपादक श्रीराम पवार, सकाळचे चीफ ऑपरेटिंग ऑफिसर महेंद्र पिसाळ, 'ॲग्रोवन'चे संपादक आदिनाथ चव्हाण, सरव्यवस्थापक प्रमोद राजेभोसले, जैन इरिगेशनचे सिस्टिम

## संजीव माने महाराष्ट्राचे स्मार्ट शेतकरी

लिमिटेडचे सहव्यवस्थापकीय संचालक अतुल जैन, बँक ऑफ महाराष्ट्रचे सरव्यवस्थापक रमेश क्षीरसागर, सोनाई कॅटल फीडचे अध्यक्ष किशोर माने, स्मार्टकेम टेक्नोलॉजीचे उपाध्यक्ष नरेंद्र देशमुख, सहयोगी उपाध्यक्ष विजयराव पाटील, ओरिएन्टल इन्शुरन्सच्या क्षेत्रिय प्रबंधक विनिता जोशी, चौधरी यात्रा कंपनीचे संचालक ब्रिजमोहन चौधरी, यूपीएलचे टेक्नोलॉजी हेड डॉ. माधव नाटेकर आदींच्या उपस्थितीत हा सोहळा पार पडला. 'ॲग्रोवन'चे नवे ॲप आणि वेबसाईटचेदेखील या वेळी अनावरण करण्यात आले.

राज्यातील अकरा प्रयोगशील शेतकऱ्यांना या वेळी 'ॲग्रोवन स्मार्ट ॲवॉर्ड'ने गौरविण्यात आले. या सोहळ्याला सोनाई कॅटल फीड्स, यूपीएल, जैन इरिगेशन सिस्टिम्स लि., स्मार्टकेम फर्टिलायझर्स लि. बँक ऑफ महाराष्ट्र, ओरिएन्टल इन्शुरन्स, चौधरी यात्रा कंपनी प्रा.लि. यांचे प्रायोजकत्व लाभले.

'ॲग्रोवन' स्मार्ट शेतकरी पुरस्कारांविषयी अवघ्या महाराष्ट्राच्या कृषी क्षेत्रात उत्सुकता लागून असते. या पुरस्कारासाठी निवड समितीमार्फत राज्य पातळीवरील पाच आणि विभागीय पातळीवरील पाच स्मार्ट शेतकरी निवडण्यात आले. परीक्षक म्हणून माजी कुलगुरू डॉ. व्यंकट मायंदे, कृषी तज्ज्ञ डॉ. सौ. तरन्नुम कादरभाई आणि सेंद्रिय गटशेतीचे प्रसारक अंकुश पडवळे यांनी काम पाहिले. सांगली जिल्ह्यातील कृषिभूषण शेतकरी श्री. माने यांना एक लाख रुपये, सन्मानपत्र आणि स्मृतिचिन्ह असे स्वरूप असलेला 'ॲग्रोवन महाराष्ट्राचा स्मार्ट शेतकरी' हा सर्वांत मानाचा पुरस्कार घोषित होताच सभागृहात टाळ्यांचा प्रचंड गजर झाला.

राज्याचे सहकारमंत्री सुभाष देशमुख यांनी पुरस्कारप्राप्त शेतकऱ्यांचे तोंड भरून कौतुक केले. निराशा आणि समस्यांच्या वातावरणातही कर्तृत्ववान शेतकऱ्यांना जगासमोर आणणारा 'ॲग्रोवन'चा उपक्रम स्तुत्य असल्याचे श्री. देशमुख म्हणाले. "शेतकरी हाच आपला पोशिंदा आहे. कर्जमाफी किंवा शेतमाल भाव वाढून मिळत असल्यास शहरवासीयांनी आमच्या समस्याग्रस्त शेतकऱ्यांच्या पाठिशी उभे राहावे, मी तुम्हाला हात जोडून विनंती करतो, असे भावनिक आवाहन श्री. देशमुख यांनी करताच सभागृह गलबलून गेले.

'ॲग्रोवन महाराष्ट्राचा स्मार्ट शेतकरी' पुरस्कार स्वीकारताना सभागृहातून होत असलेला टाळ्यांचा गजर आणि कौतुकाचा वर्षाव पाहून श्री. माने यांचे डोळे भरून आले. 'प्रयोगशील शेतकरी म्हणून अनेक पुरस्कार मी स्वीकारले, पण आज माझ्या आनंदाला पारावार राहिलेला नाही. आनंद गगनात मावेनासा होणे म्हणजे काय असते ते मी आज अनुभवतो आहे. मी 'ॲग्रोवन'च्या कायम ऋणात राहीन, असे भावपूर्ण उद्गार श्री. माने यांनी काढले.

विदर्भातील आत्महत्याग्रस्त कुटुंबातील महिला शेतकरी ज्योती देशमुख यांना 'ॲग्रोवन प्रेरणा' पुरस्काराचे वितरण होताना सभागृह काही क्षण निःशब्द झाले होते. आत्महत्याग्रस्त कुटुंबाला सावरण्यासाठी जिद्दीने शेती करीत असलेल्या ज्योतीताईंची यशोगाथा ऐकल्यानंतर त्यांच्या कर्तृत्वाला सलाम करण्यासाठी अवघ्या सभागृहाने उभे राहून टाळ्यांचा प्रचंड कडकडाट करत मानवंदना दिली.

**स्मार्ट शेतकरी पुरस्काराचे मानकरी असे :**

ॲग्रोवन महाराष्ट्राचा स्मार्ट शेतकरी - संजीव माने (मु. पो. आष्टा, ता. वाळवा, जि. सांगली), ॲग्रोवन स्मार्ट महिला शेतकरी - विद्या रुद्राक्ष (डिघोळअंबा, अंबाजोगाई, बीड), ॲग्रोवन स्मार्ट सेंद्रिय शेती - प्रभाकर चौधरी (सुभाषनगर, धुळे), ॲग्रोवन स्मार्ट कृषी उद्योजक - विकास दांगट (पुणे), ॲग्रोवन प्रेरणा पुरस्कार - ज्योती देशमुख (कटयार, अकोला), ॲग्रोवन स्मार्ट कृषिपूरक व्यवसाय - पृथ्वीराज चव्हाण (विठ्ठलवाडी, वाई, सातारा), ॲग्रोवन पश्चिम महाराष्ट्राचा स्मार्ट शेतकरी - तानाजी हाके (खर्डी, पंढरपूर, सोलापूर), ॲग्रोवन उत्तर महाराष्ट्राचा स्मार्ट शेतकरी - नाना पाटील (पिंप्रीखुर्द, चाळीसगाव, जळगाव), ॲग्रोवन कोकणचा स्मार्ट शेतकरी - रामचंद्र सावे (चिंचणी, डहाणू, पालघर), ॲग्रोवन मराठवाड्याचा स्मार्ट शेतकरी - रवींद्र देवरवाडे (देवळा, अंबाजोगाई, बीड), ॲग्रोवन विदर्भाचा स्मार्ट शेतकरी - मोहन जगताप (वळती, चिखली, बुलडाणा).

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
प्रस्तावित
महाराष्ट्र स्कूल ऑफ ड्रामा
आयोजित
आवाजाची कार्यशाळा
(Voice & Speech Workshop)
कालावधी : दि. १५ जानेवारी ते २९ जानेवारी २०१८
: मार्गदर्शक :
अश्विनी गिरी, अभय कुलकर्णी आणि उत्तरा बावकर
प्रवेश अर्ज भरण्याची अंतिम दिनांक : ६ जानेवारी २०१८
शैक्षणिक पात्रता : बारावी पास ● प्रवेश शुल्क : रु. १५००/- फक्त
अधिक माहिती www.pldkalaacademy.org व
www.facebook.com/maharashtra school of drama
या संकेत स्थळांवर उपलब्ध. भ्रमणध्वनी क्र.: ९१३७०२६०८३
(प्रवेश मर्यादित)
कार्यशाळा स्थळ : पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई - २५
आगामी कार्यशाळा : १) रंगभूषा कार्यशाळा (फेब्रुवारी २०१८)
२) नाट्य-लेखन कार्यशाळा (मार्च २०१८)
जयश्री भोज (भा. प्र. से.)
व्यवस्थापकीय संचालक, दादासाहेब फाळके चित्रनगरी तथा अध्यक्ष, कार्यकारी समिती, महाराष्ट्र स्कूल ऑफ ड्रामा
संजीव सुर्यकांत पलांडे (अपर जिल्हाधिकारी)
प्रकल्प संचालक, पु. ल. देशपांडे कला अकादमी तथा सदस्य सचिव, महाराष्ट्र स्कूल ऑफ ड्रामा
अभिराम भडकमकर, डॉ. अमोल देशमुख, श्रीपाद जोशी आणि दीपक करंजीकर
(सदस्य, महाराष्ट्र स्कूल ऑफ ड्रामा)
डीजीआयपीआर २०१७/२०१८/५०६८